
ग्रं. सं. वाचनालय, ठाणें
विषय का. वा.
क्र. ६२५९
IRBK-0106258
IRBK-0106258







सं. ठाणे



# कथासरित्सागर

## सम्राट विक्रमादित्य

प्र. शं. जोशी

# सम्राट विक्रमादित्य

प्र. शं. जोशी

IRBK-0106258

। पैसे

वोरा ॲण्ड कंपनी पब्लिशर्स प्रायव्हेट लिमिटेड,
३, राउंड बिल्डिंग, काळबादेवी रस्ता, मुंबई २

प्रकाशक :

एम्. के. वोरा
वोरा ॲण्ड कंपनी,
पब्लिशर्स (प्रायव्हेट) लि०
३ राउंड बिल्डिंग,
काळबादेवी रस्ता, मुंबई २

किंमत चाळीस नये पैसे

पहिली आवृत्ति : १९५७

सर्वाधिकार प्रकाशकाधीन

मुद्रक :
जयंत श्रीधर टिळक,
केसरी मुद्रणालय,
५६८ नारायण पेठ, पुणें २

# प्रकाशकाचें निवेदन

व्यास व वाल्मीकि हे महाकवि आपल्या परिचयाचे आहेत. पण त्यांच्याच तोडीचा महाकवि गुणाढ्य मात्र अनेकांना माहीतहि नसतो. कालिदास, बाण, सुबंधु इत्यादि संस्कृत कवींनीं गुणाढ्याच्या 'बृहत्कथे'चा मोठा गौरवपूर्वक उल्लेख केला आहे. गोवर्धन कवीनें तर गुणाढ्याला महर्षि व्यासांचा अवतारच मानिलें आहे. गुणाढ्यानें 'बृहत्कथा' नांवाचें आपलें महाकाव्य 'पैशाची' नांवाच्या प्राकृत भाषेंत लिहिलें. पण तें इतकें लोकप्रिय झालें कीं, 'बृहत्कथामंजरी', 'कथासरित्सागर', 'बृहत्कथासंग्रह' इत्यादि अनेक संस्कृत ग्रंथ त्यावरून रचले गेले. 'बृहत्कथा' हा ग्रंथ बाराव्या शतकापर्यंत उपलब्ध होता असें अनुमान विद्वानांनीं काढलें आहे. पण त्यानंतर मात्र या महाकाव्याला दुर्दैवानें आपण पारखे झालों. गुणाढ्या-संबंधींहि विश्वसनीय ऐतिहासिक माहिती आपणांस मिळत नाहीं.

'संस्कृत साहित्य सरिता' हा प्रकाशन-संच आम्हीं गतवर्षी प्रसिद्ध केला. त्यांत सर्व प्रसिद्ध संस्कृत ललित वाङ्मय संक्षिप्त कथारूपानें दिलें आहे. या आमच्या प्रकाशनाचें सर्वत्र अत्यंत उत्साहानें स्वागत झालें. भारताचें सांस्कृतिक वाङ्मयीन धन मराठी मायबोलींतून सर्वसामान्य मराठी वाचकवर्गाच्या हातीं, अल्पमूल्यांत देण्याच्या या उपक्रमाबद्दल आमच्यावर धन्यवाद-अभिनंदनांचा खरोखरी वर्षाव झाला. याबद्दल आम्ही सर्वांचे ऋणी आहोंत.

याच दृष्टीनें हें पुढलें पाऊल आम्हीं टाकलें आहे. 'संस्कृत साहित्य सरितें'त आम्हीं अनेक लेखकांचें सहकार्य घेतलें होतें. 'कथासरित्सागरा'चीं हीं दहाहि पुस्तकें मात्र श्री. प्र. शं. जोशी, एम्. ए., बी. टी., काव्यतीर्थ, व्याकरणविशारद यांनीं एकट्यांनींच अनुवादित व संकलित केलेलीं आहेत.

# कथानकाची भूमिका

नरवाहनदत्त मदनकंचुकीसह कौशांबींत रहात असतांना मानसवेग नांवाच्या त्याच्या दुष्ट शत्रूनें मदनकंचुकीला पळवून नेलें. नरवाहनदत्तानें पृथ्वी पालथी घातली, पण तिचा शोध लागला नाहीं. तशा स्थितींत वेगवती नांवाच्या एका विद्याधरीनें मदनकंचुकीच्या शोधासाठीं नरवाहनदत्ताला आकाशमार्गानें आषाढ पर्वतावर आणलें. मानसवेग त्या दोघांना मारण्यासाठीं धांवला. तेव्हां आपल्या विद्येच्या सामर्थ्यानें त्या विद्याधरीनें मानसवेगाचा पराभव केला, पण प्रत्यक्ष वडील भावाशीं विरोध केल्यामुळें तिच्या विद्या दुर्बल झाल्या. त्या पुन: मिळविण्यासाठीं ती तपश्चर्या करण्याकरितां पर्वतावर निघून गेली. जाण्यापूर्वी नरवाहनदत्ताच्या रक्षणाची जबाबदारी तिनें विद्या नांवाच्या एका सखीवर सोंपविली.

परका प्रांत व प्रियेचा विरह असह्य झाल्यामुळें जिवाला कंटाळून आत्महत्येच्या विचारानें नरवाहनदत्त अरण्यांतून भटकत होता. त्या वेळीं तेथें आलेल्या कण्व मुनींनीं अन्तर्ज्ञानानें त्याची मन:स्थिति जाणली व त्याच्या पूर्वजांच्या कथा सांगून त्याला धीर दिला. त्याच्या मनाला विरंगुळा वाटावा म्हणून विक्रमादित्याची जी गोष्ट कण्व मुनींनीं त्याला सांगितली ती ही गोष्ट कथासरित्सागराच्या शेवटल्या लंबकांत आली आहे.

# सम्राट विक्रमादित्य

★

## पुत्रप्राप्तीसाठीं शंकराची उपासना

अवंती देशांत उज्जयिनी नांवाचें एक वैभवशाली नगर होतें. त्या नगरांत महेन्द्रादित्य नांवाचा एक पराक्रमी व दानशूर राजा राज्य करीत होता. त्याच्या पट्टराणीचें नांव होतें सौम्यदर्शना. सर्व प्रकारचीं सुखें तिच्या पायांशीं लोळण घेत होतीं. पण 'आपल्याला पुत्र नाहीं,' या एकाच विचारानें ती अधूनमधून अस्वस्थ होई. तिची खिन्नता राजाच्या लक्षांत आली. स्वतःला मुलगा नाहीं याचें दुःख त्यालाहि होतच होतें. पुत्रप्राप्तीसाठीं तीं दोघेंहि शंकराची उपासना करूं लागलीं.

• • •

## शंकराची माल्यवानास आज्ञा

त्याच वेळीं इन्द्र वगैरे देव कैलासावर आले. शंकरांनीं त्यांचें स्वागत केलें व त्यांना त्यांच्या येण्याचें कारण विचारलें. तेव्हां इन्द्र म्हणाला, "महाराज! विष्णूंनीं व आपण मारलेले दानव पृथ्वीवर म्लेच्छांच्या रूपानें जन्मास आले आहेत. ते दुष्ट धार्मिक लोकांना मारतात, यज्ञांमध्यें विघ्नें आणतात, मुनींच्या आश्रमांना त्रास देतात व आमच्या भक्तांचा छळ करतात. तेव्हां त्यावर आपण कांहींतरी उपाय योजावा अशी आमची विनंति आहे." इन्द्राची ही विनंति ऐकून शंकरांनीं माल्यवान नांवाच्या आपल्या गणाला बोलावलें व ते त्याला म्हणाले, "पुत्रा! दानवांनीं म्लेच्छांच्या रूपानें मृत्युलोकांत धुमाकूळ घातला आहे. तूं उज्जयिनींतील महेंद्रादित्याचा पुत्र हो आणि वैदिक धर्माचा नाश करणाऱ्या म्लेच्छांचा कायमचा बंदोबस्त कर. माझ्या

प्रसादानें तूं सप्तद्वीपांचा सम्राट होशील व यक्ष, राक्षस आणि वेताळ हे तुझ्या आज्ञेंत रहातील. तुझें मृत्युलोकावरील कार्य संपल्यावर पुनः तूं माझा गण बनून येथेंच येशील."

● ● ●

## शंकराचा दृष्टान्त व विक्रमादित्याचा जन्म

भगवान शंकराचा सहवास सोडून दुःखांनीं भरलेल्या भूलोकावर जाणें माल्यवानाच्या जिवावर आलें. पण शंकराची आज्ञा होती ती! आज्ञा शिरसावंद्य मानून माल्यवान तेथून अदृश्य झाला. त्याच वेळीं महेन्द्रादित्याच्या उपासनेमुळें संतुष्ट झालेल्या शंकरांनीं त्याला स्वप्नांत दर्शन दिलें आणि सौम्यदर्शनेच्या पोटीं एक महापराक्रमी सम्राट जन्माला येणार आहे, ही आनंदाची बातमी त्यांनीं महेन्द्रादित्याला सांगितली. सौम्यदर्शनेलाहि त्या रात्रीं एक स्वप्न पडलें. त्या स्वप्नांत शंकरांनीं तिला एक फळ दिलें. तें ऐकून राजाचा आनंद द्विगुणित झाला.

कांहीं काळानंतर एक अत्यंत तेजस्वी बालक तिच्या पोटीं जन्माला आला. त्या वेळीं राजधानींत आनंदीआनंद झाला. पुत्रजन्मामुळें राजाचा आनंद गगनांत मावेना. त्यानें त्यानिमित्त मोठा उत्सव केला. सर्वांना त्यानें दान व देणग्या दिल्या. आपल्या मुलाचें बारसें त्यानें मोठ्या समारंभपूर्वक केलें. शंकराच्या आज्ञेवरून त्यानें आपल्या मुलाचें नांव 'विषमशील' असें ठेवलें. पण त्याच्या दिपविणाऱ्या पराक्रमामुळें, तो पुढें 'विक्रमादित्य' या नांवानेंच प्रसिद्धीस आला. विक्रमादित्याच्या जन्माच्या वेळींच सुमति नांवाच्या सचिवाला महामति नांवाचा एक मुलगा झाला. राजपुरोहिताचा मुलगा श्रीधर हाहि त्याच वयाचा होता. आपल्या बरोबरीच्या मित्रांसह विक्रमादित्य लहानपणींचे दिवस मजेंत घालवूं लागला.

● ● ●

**विक्रमादित्याला सम्राटपद**

राजा महेंद्रादित्यानें विक्रमादित्याच्या शिक्षणाची उत्तम सोय केली. त्या त्या विद्यांत व कलांत निष्णात असलेल्या आचार्यांकडून तो पाठ घेऊं लागला. त्यानें थोड्याच काळांत सर्व विद्या व कला सहज आत्मसात् केल्या. शस्त्रास्त्रविद्येंत तर त्यानें आपल्या आचार्यांनाहि मागें टाकलें. आपला विद्याभ्यास पूर्ण झाल्यावर तो मोठ्या सैन्यानिशीं दिग्विजयासाठीं निघाला. त्याच्यापुढें कोणाचाहि निभाव लागला नाहीं. त्यानें सर्व राजांना आपले मांडलिक बनविलें. अनेक राजांनीं आपल्या सुंदर मुली त्याला दिल्या. त्यांच्या राज्यलक्ष्मीप्रमाणेंच त्यानें त्या मुलींचाहि स्वीकार केला. आपला मुलगा पृथ्वीचें राज्य करण्यास समर्थ झाला आहे हें पाहून महेन्द्रादित्यानें त्याला राज्याभिषेक केला. कांहीं काल विक्रमादित्याला मार्गदर्शन करून त्यानें वैराग्य धारण केलें व शंकराच्या आराधनेंत तो उरलेलें आयुष्य घालवूं लागला.

• • •

**दक्षिण-दिग्विजय**

विक्रमादित्यानें प्रजाजनांचा अन्याय दूर केला. सर्व राजे लोक तर त्याला भिऊन वागत होतेच; पण यक्ष, राक्षस, पिशाच्च, वेताळ यांनाहि तो आपल्या दिव्य सामर्थ्यानें कडक शासन करीत असे. वैदिक धर्मास उपद्रव पोंचविणाऱ्या म्लेच्छ जमातींना त्याचा इतका दरारा वाटत होता कीं, त्याच्या राज्यांत मान वर काढायची त्यांपैकीं कोणाचीहि छाती नव्हती. असें असलें तरीदेखील, एखादा उद्धट राजा त्याच्या आज्ञा धाब्यावर बसवीत असे. त्या वेळीं त्याच्या बंदोबस्तासाठीं तो विक्रमशक्ति नांवाच्या आपल्या सेनापतीला पाठवीत असे.

एकदां सेनापति विक्रमशक्ति दक्षिणेकडील एका राजावर स्वारी करण्यासाठीं गेला होता. त्याच्याकडची बातमी मिळविण्यासाठीं

विक्रमादित्यानें आपला एक खास दूत त्याच्याकडे पाठविला. त्या दूताचें नांव होतें अनंगदेव. दक्षिणेकडे जाऊन अनंगदेवानें एक गमतीदार बातमी आणली. ती सांगण्यासाठीं मोठ्या उत्सुकतेनें तो राजाकडे आला व त्यानें राजाचा जयजयकार केला. राजानें त्याला विक्रमशक्तींचें कुशल विचारतांच तो म्हणाला, "महाराज! आपल्या सेनापतींनीं दक्षिणेकडील बंडखोर राजांचा पुरा धुव्वा उडविला आहेच; पण अनेक उद्दाम म्लेच्छांनाहि त्यांनीं चांगलेच खडे चारले आहेत. सर्व प्रदेश जिंकून ते आतां इकडे यायला निघाले आहेत. एक-दोन दिवसांतच ते येथें येऊन पोहोंचतीलहि." आपल्या विजयाची बातमी ऐकून विक्रमादित्याला अत्यंत आनंद झाला. संतुष्ट होऊन त्यानें चांगली बातमी आणल्याबद्दल अनंगदेवाला मोठें बक्षीस दिलें.

• • •

## सिंहलेश्वराचें अनंगदेवास आमंत्रण

नंतर गप्पागोष्टी चालल्या असतां विक्रमादित्यानें त्याला विचारलें, "अनंगदेवा! तुझ्या या प्रवासांत तुला कांहीं अद्‌भुत गोष्टी दिसून आल्या काय?" तेव्हां अनंगदेव सांगूं लागला : महाराज! आहे एक मजेशीर व अद्‌भुत घटना. मला ती आपणाला सांगायचीच होती. तेव्हां आतांच सांगतों. ऐका. मी येथून निघालों व विक्रमशक्तींच्या शिबिराला जाऊन पोहोंचलों. समुद्राप्रमाणें पसरलेली अफाट सेना पाहून मी चकित होऊन गेलों. त्या शिबिरांतच मीहि कांहीं दिवस असतांना, सिंहलेश्वराचा एक दूत तेथें आला व विक्रमशक्तींना म्हणाला, "सेनापतिमहाराज! सम्राट विक्रमादित्यांचा एक जिवलग सेवक आपणाकडे आल्याचें आमच्या महाराजांना समजलें. कांहीं महत्त्वाच्या कार्यासाठीं त्यांनीं त्याला सुवर्णनगरीला पाठवून देण्याची आपणास विनंति केली आहे."

• • •

## सिंहलेश्वर वीरसेनाचा कन्यादानाचा विचार

सिंहलेश्वराची ही विनंति ऐकून सेनापतींनीं मला त्या दूताबरोबर सिंहलद्वीपास जाऊन येण्याची आज्ञा केली. आम्हीं नावेनें समुद्रांतून प्रवास करीत, त्या द्वीपाच्या राजधानीस येऊन पोहोंचलों. त्या राजधानींतील सुवर्णप्रासादांचीं उंच उंच शिखरें सूर्याच्या प्रकाशांत तळपत होतीं. तें पाहून 'सुवर्णनगरी' हें त्या राजधानीचें नांव मला अगदीं यथार्थ वाटलें. मी राजवाड्यांत आलों तेव्हां तर तेथील वैभवानें माझे डोळे दिपून गेले. मी वीरसेन महाराजांच्या भेटीला गेलों. तेव्हां आनंदानें माझें स्वागत करून ते म्हणाले, "अनंगदेवा! माझी मुलगी मदनलेखा आतां उपवर झाली आहे. सम्राट विक्रमादित्य हेच तिला अनुरूप पति आहेत असें मला वाटतें.

इतक्यांत स्वत: मदनलेखाच कांहीं कामानिमित्त तेथें आली. तिचें लावण्य पाहून मी तर विस्मतच झालों. ती वडिलांशीं कांहीं बोलणार त्यापूर्वींच वीरसेन महाराज मला म्हणाले, "हीच ती माझी मुलगी मदनलेखा. आवडेल ना ही सम्राट विक्रमादित्यांना?" त्यांचा तो प्रश्न ऐकून मदनलेखा खूप लाजली. वीरसेन महाराज तिला बोलावीत असतांहि ती कांहीं तरी निमित्त काढून तेथून पसार झाली.

मग मलाच रहावलें नाहीं. मी त्यांना म्हणालों, "आमच्या महाराजांना आपली कन्या अत्यंत अनुरूप आहे. ती त्यांना नक्कीच आवडेल." माझें हें मत ऐकून सिंहलाधिपति मला म्हणाले, "ठीक आहे. माझ्यातर्फे सम्राट विक्रमादित्यांना तूं ही विनंति कर. तुझ्याबरोबर माझा एक दूत येईलच. तुम्ही दोघे पुढें व्हा. तुमच्या मागोमाग मदनलेखेला पाठविण्याची मी व्यवस्था करतोंच." असें म्हणून त्यांनीं मला निरोप दिला. नंतर त्यांच्या हवलसेन या दूताबरोबर मी सिंहलद्वीपाहून

परत यायला निघालों आणि पूर्वी कधींहि न पाहिलेला एक अद्‌भुत चमत्कार आम्हांला समुद्रांत पहावयास मिळाला.

• • •

## दोन दिव्य कन्यका

आम्ही नावेंतून परत येत असतां, मध्येंच समुद्रांतून वर आलेलें एक वाळवंट आम्हांला दिसलें. त्या वाळवंटावर दोन अद्‌भुत मुली एका सुवर्णमृगाशीं खेळत असलेल्या आमच्या दृष्टीस पडल्या. त्या मुलींपैकीं एक होती गोरी व दुसरी होती काळी. स्वर्गीय स्त्रियांनाहि लाजवील असें त्यांचें लावण्य होतें. त्या आपल्या रत्नजडित सुवर्णमृगाला खेळवीत खेळवीत किनाऱ्यावर आल्या. त्यांच्याबद्दल आश्चर्य करीत आम्ही पुढें चाललों, तोंच एकाएकी मोठें वादळ सुरू झालें. त्या वादळाच्या तडाख्यांत आमच्या नावेचा निभाव लागेना. शेवटीं ती जवळच्याच एका खडकावर आपटली व फुटली. आम्ही समुद्रांत फेंकले गेलों. आमच्या बरोबरच्या इतर प्रवाश्यांना जलचरांनीं खाऊन टाकलें. आम्हांलाहि ती भीति होतीच. पण त्या दोन मुलींनीं आम्हां दोघांना पाण्यांतून वर काढलें व त्या वाळवंटावर आणलें.

• • •

## शिवपूजेचा अद्‌भुत प्रकार

प्राणसंकटांतून वांचविल्याबद्दल आम्ही त्या दोघींचे आभार मानले. पण पुढचा प्रवास कसा करायचा याचीच आम्हांला काळजी वाटूं लागली. धीर देत त्यांनीं आम्हांला एका गुहेंत नेलें. एकापेक्षां एक आश्चर्यकारक गोष्टी आम्हांला तेथें पहायला मिळाल्या. त्या गुहेंत निरनिराळ्या प्रकारच्या वृक्षलतांनीं भरलेलें एक दिव्य वन आम्हांला लागलें. त्या वनांतून चाललों असतां एका अद्‌भुत सरोवराजवळ आम्ही आलों. त्याच वेळीं सरोवरांत स्नान केलेल्या एका दिव्य स्त्रीनें तेथील कांहीं ताजीं कमळें

२२५०१ 
८१०
२७।१।७

तोडलीं व कमरेएवढ्या पाण्यांतच राहून, डोळे मिटून परमेश्वराचें ध्यान केलें. त्याबरोबर त्या सरोवराच्या पाण्यांतून एक शिवलिंग तिच्यापुढें आलें. तिनें त्या लिंगाला ताजीं कमळें वाहिलीं, हात जोडून प्रार्थना केली व त्याचें विसर्जन केलें. तेव्हां तें शिवलिंग पुन्हां सरोवरांत बुडालें. ती आपल्या या छोट्या परिवारासह तेथून घरीं निघाली.

ती कोण आहे ? हें जाणून घेण्यासाठीं आम्हीं तिच्या परिवारांतील अनेकांना विचारलें. पण कोणींच कांहीं बोललें नाहीं. तेव्हां सिंहलेश्वरांच्या दूतास आपल्या प्रभावाची चुणुक दाखविण्यासाठीं मी त्या स्त्रीलाच म्हणालों, " तूं कोण आहेस तें मला न सांगतां पुढें जाशील, तर तुला सम्राट विक्रमादित्याची शपथ आहे. " माझे हे शब्द कानीं पडतांच तिनें आपल्या दासींना थांबायला सांगितलें. ती नम्रपणें माझ्याजवळ आली व म्हणाली, " मोठ्या संकटांतून माझें रक्षण करून सम्राट विक्रमादित्यांनीं माझ्यावर अनंत उपकार केले आहेत. पण मी कोण ? त्यांनीं मला कशी मदत केली ? हें सर्व मी घरीं गेल्यावर तुम्हांला सांगतें. " असें म्हणून तिनें आम्हांला आपल्या घरीं नेलें. तिचें घर म्हणजे रत्नांनीं जडविलेला व सोन्यानें मढविलेला एक भव्य वाडाच होता. स्वर्गासारख्या रम्य वातावरणांत आम्ही आलों होतों. तिनें मोठ्या आदरानें आमचें स्वागत केलें. तिच्याबरोबर पंचपक्वान्नांचें जेवण झाल्यावर आम्हीं थोडी विश्रांति घेतली. त्यामुळें आमचा सर्व शीण नष्ट झाला. नंतर ताजेतवाने होऊन आम्ही तिच्या भेटीस गेलों.

● ● ●

## मदनमंजरीवरील भयानक संकट

त्या वेळीं ती आपल्या सखींच्या घोळक्यांत बसली होती. तिनें आम्हांला रत्नजडित आसनांवर बसण्याची विनंति केली व आमचा

आशय ओळखून ती आपण होऊनच आपला इतिहास सांगूं लागली. ती म्हणाली :

... " अनंगदेवा ! कुबेराचे धाकटे बंधु मणिभद्र हे तुला ऐकून तरी माहीत असतील. ते माझे पति. माझें नांव मदनमंजरी. मी आपल्या पतीसह एकदां उज्जयिनी नगरीच्या उपवनांत विहार करण्यासाठीं गेलें असतां एका दुष्ट मांत्रिकानें मला पाहिलें. त्या नीचानें मला वश करण्यासाठीं स्मशानांत जाऊन होम करायला सुरुवात केली. त्याची कल्पना येतांच मी ती गोष्ट माझ्या पतिराजांना सांगितली. आम्हीं आपली सुटका करून घेण्यासाठीं त्रैलोक्यांत कोठेंहि दडी मारून बसलों असतों, तरी त्या दुष्टानें मंत्रसामर्थ्यानें मला खेंचून आणलेंच असतें. म्हणून यांतून आतां सुटका कशी करून घ्यावी याबद्दल माझ्या पतींनीं ब्रह्मदेवांना विचारलें. तेव्हां ब्रह्मदेव म्हणाले, " मंत्रांचें सामर्थ्य विलक्षण आहे. त्या मांत्रिकाचा होम पूर्ण होण्यापूर्वीं त्यांत विघ्नें आणून सुटका करून घेतां येईल. पण आतांपर्यंत तो होम पूर्णहि झाला असेल. तेव्हां सम्राट विक्रमादित्याचा धांवा करणें, हा एकच सुटकेचा मार्ग दिसतो. " ब्रह्मदेव हें सांगत असतांना त्या मांत्रिकाचा होम पूर्ण झाला होता व तो मांत्रिक आचमन करण्यासाठीं नदीच्या पात्रांत उभा होता. त्या वेळीं त्याच्या मंत्रसामर्थ्यानें मी त्या स्मशानाकडे खेंचलीं गेलें.

• • •

## विक्रमादित्याकडून मदनमंजरीची मुक्तता

ब्रह्मदेवाचें वचन आठवून मी सम्राट विक्रमादित्याचा धांवा केला. त्याच क्षणीं विक्रमादित्य तेथें प्रगट झाले व अग्निशिख नांवाच्या एका वेताळाला बोलावून त्यांनीं त्याला आज्ञा केली, " परस्त्रीचें अपहरण करणाऱ्या या मांत्रिकाला तूं मारून खा व त्याला त्याच्या पापाचें प्रायश्चित्त दे. " सम्राटाची आज्ञा होतांच वेताळानें प्रचंड रूप धारण केलें. तें पाहून

तो मांत्रिक भीतीनें पळून जाऊं लागला. पण वेताळानें त्याचा पाठलाग केला. त्याचे पाय पकडले व त्याला जोरानें गरगर फिरवून दगडावर आपटलें. त्याबरोबर त्या दुष्टाच्या शरिराचा चेंदामेंदा झाला. अशा रीतीनें सम्राट विक्रमादित्यांनीं मोठ्या संकटांतून मला वांचाविलें व ते पुन्हां अदृश्य होऊन निघून गेले.

इकडे मांत्रिकाचें शरीर छिन्नविच्छिन्न झालेलें पाहून, त्याचें मांस खाण्यासाठीं अनेक भुतें, पिशाच्चें जमलीं. कांहीं वेताळहि धांवून आले. तेव्हां अग्निशिखानें त्या सर्वांना अडाविलें व तो म्हणाला, " मूर्खांनो ! सम्राट विक्रमादित्यानें याला खाऊन टाकण्याची मला आज्ञा केली आहे. तुम्हीं याला हात लावाल तर खबरदार ! " तेव्हां यमशिख नांवाचा दुसरा एक वेताळ त्याला म्हणाला, " असा कोण लागून गेला आहे तो विक्रमादित्य, कीं ज्याची आज्ञा आम्हीं वेताळांनींहि मानावी ! तें कांहीं नाहीं. मीच या प्रेताच्या शरिराचा फडशा पाडतों. तो विक्रमादित्य काय करतो बघूंच ! " असें म्हणून यमशिख प्रेत उचलण्यासाठीं पुढें सरसावला. तेव्हां अग्निशिख समजावणीच्या स्वरांत त्याला म्हणाला, " बाबारे ! विक्रमादित्याचा प्रभाव फार मोठा आहे. तुला माहीत नसेल तर सांगतों ऐक." असें म्हणून तो पूर्वीं घडलेली एक हकीगत सांगूं लागला.

● ● ●

## एका अटीवर डाकिनेयाची सुटका

अग्निशिख सांगूं लागला : या नगरींत डाकिनेय नांवाचा एक अट्टल आणि बदमाष जुगारी होता. दुर्दैवानें तो जुगारांत बरेंच धन हरला. अनेक लोकांकडून त्यानें कर्ज काढलें होतें, तें फेडायला त्याच्याजवळ फुटकी कवडीहि शिल्लक उरली नव्हती. म्हणून शेवटीं कर्ज देणाऱ्या त्याच्या मित्रांनीं त्याला मरेपर्यंत झोडपून काढलें. त्यांतूनहि तो जिवंत राहिलाच तर आपला सूड उगवील, या भीतीनें त्यांनीं त्या

डाकिनेयाला जवळच्या एका विहिरींत ढकलूनहि दिलें. तो आंत पडायचा अवकाश, विहिरीच्या तळाशीं असलेले दोन ब्रह्मराक्षस त्याला खाण्यासाठीं धांवून आले. मरणाच्या दाढेंतहि तें अकल्पित संकट पाहून डाकिनेय भांबावून गेला. त्यानें आपली कर्मकहाणी त्या ब्रह्मराक्षसांना सांगितली. एका निरपराध ब्राह्मणकन्येला झपाटल्यामुळें विक्रमादित्यानेंच, आपल्या प्रभावानें त्या ब्रह्मराक्षसांना वर्षभर विहिरींत डांबून घेण्याची शिक्षा ठोठावली होती. शिक्षेची मुदत संपायला फक्त एक आठवडाच शिल्लक राहिला होता. त्याच वेळीं डाकिनेयाला त्याच्या मित्रांनीं आंत ढकललें होतें. पण डाकिनेयाची हकीगत ऐकून त्या ब्रह्मराक्षसांना त्याची दया आली. एका अटीवर त्यांनीं डाकिनेयाला सोडण्याचें कबूल केलें. ते म्हणाले, " या आठ दिवसांत त जर आम्हांला रोज कांहीं खाद्य पुरवणार असशील, तर आम्हीं तुझी मुक्तता करूं. नाहीं तर आतांच तुझ्या शरिराची चटणी उडवूं." डाकिनेयानें त्यांना खाद्य पुरविण्याचें वचन दिलें तेव्हां त्यांनीं डाकिनेयाला विहिरींतून वर फेंकलें.

इकडे डाकिनेय वचन देऊन वर आला खरा, पण ब्रह्मराक्षसांना खाद्य कसें पुरवायचें हा प्रश्न त्याला पडला. खूप विचार करून रात्रींच्या वेळीं तो या स्मशानांत आला. रोगाची बाधा नसलेलें व शस्त्राचा आघात न झालेलें एक प्रेत खांद्यावर टाकून तो फिरूं लागला. त्या वेळीं मला अत्यंत भूक लागली होती. मी त्याच्याजवळ गेलों व " या प्रेताबद्दल तूं काय घेणार ? " असें मीं त्याला विचारलें. तेव्हां आपली सर्व हकीगत ऐकवून तो मला म्हणाला, " याच्या बदल्यांत सात दिवसांच्या मुदतीनें तूं मला तुझें रूप व प्रभाव दे. आठव्या दिवशीं मी तें सर्व तुला परत करीन." मलाहि त्याची दया आली व माझें रूप व सामर्थ्य मी त्याला दिलें. त्यानंतर दररोज डाकिनेय वेताळाचें रूप घेई, आपल्याला मरेपर्यंत चोप देऊन विहिरींत ढकलणाऱ्या मित्रांपैकीं प्रत्येकाला रोज ओढून नेई

व त्या ब्रह्मराक्षसांना खाद्य पुरवी. अशा रीतीनें सात दिवसांची मुदत संपतांच मीं माझें रूप व प्रभाव परत घेतला.

• • •

## डाकिनेयाचा विश्वासघातकीपणा

ब्रह्मराक्षसांना खाद्य पुरविण्याचा एकच दिवस आतां राहिला होता. तेव्हां गयावया करून तो मला म्हणाला, " मित्रा ! आज जर मीं त्यांना खाद्य पुरविलें नाहीं, तर उद्यां कांहीं माझी धडगत नाहीं. उद्यां विहिरींतून बाहेर आल्यावर मला ते नक्की खाऊन टाकतील. या बाबतींत तूं कृपाकरून मला कांहीं मदत करशील काय ? " त्याचे ते केविलवाणे शब्द ऐकून मला त्याची कींव आली. मी त्याला म्हणालों, ' असें असेल तर ते ब्रह्मराक्षस कोठें आहेत तें मला दाखीव. मीच त्यांना खाऊन टाकतों व तुझ्यावरील संकट कायमचें दूर करतों." या माझ्या आश्वासनामुळें त्याला फार आनंद झाला. " तुझे माझ्यावर अत्यंत उपकार आहेत. त्याबद्दल मी तुझा सदैव ऋणी राहीन " असें म्हणून त्यानें माझे पाय धरले. मी त्याला उठविलें व " केव्हांहि तुला मदत लागली तर मी तुझ्या मदतीला येईन " असें वचन दिलें.

नंतर तो मला घेऊन त्या विहिरीच्या कांठीं आला व मी विहिरींत वांकून पहात होतों, तोंच त्या दुष्ट डाकिनेयानें विश्वासघात करून मलाच आंत फेंकलें. मी बेसावध असतां आंत पडल्यामुळें मला दुखापत झाली. पण ' नित्याप्रमाणें आपलें भक्ष्य आलें ' असें समजून ते ब्रह्मराक्षस मला खाण्यासाठीं धांवून आले. मीं स्वतःला सांवरलें व बाहुयुद्धांत दोघांनाहि जिंकलें. माझें शौर्य पाहून त्या ब्रह्मराक्षसांना आश्चर्य वाटलें. मीं सर्व हकीगत सांगितल्यावर ते हंसून म्हणाले, " एकंदरींत त्या जुगाऱ्यानें सर्वांनाच हात दाखविलेला दिसतो. ठीक आहे ! यापुढें जुगाऱ्यावर विश्वास ठेवूं नये हा धडा आपणांस मिळाला तो काय कमी मोलाचा आहे ? " असें म्हणून त्यांनीं मला निरोप दिला व मीहि विहिरींतून वर आलों.

त्या वेळीं मला फारच भूक लागली होती. त्या रात्रीं मी तसाच उज्जयिनींत आलों. रस्त्यानें हिंडत असतां एक ब्राह्मण माझ्या दृष्टीस पडला. भुकेनें माझे प्राण कासावीस होत होते. कांहीं विचार न करतां मीं त्याची मानगुटी पकडली. तेव्हां त्यानें विक्रमादित्यांचा धांवा सुरू केला. त्याच क्षणीं प्रकट होऊन विक्रमादित्यांनीं माझ्या हातून त्या ब्राह्मणाला सोडविलें. त्याहि स्थितींत मी त्यांच्याशीं दांडगाई करूं लागलों. तेव्हां मात्र त्या राजानें जमिनीवर एका पुरुषाचें चित्र काढलें व हातांतील खड्गानें चित्रांतील आकृतीच्या मानेवर प्रहार करण्यास सुरुवात केली. पण आश्चर्य हें कीं त्या खड्गाचें प्रहार माझ्या मानेवर होऊं लागले व माझ्या जखमांतून भळाभळा रक्त वाहूं लागलें. शेवटीं मी त्याला शरण गेलों व आतां त्यांचा दास बनून राहिलों आहें.

" सम्राट विक्रमादित्यानें आज्ञा केली म्हणून या मांत्रिकाला मीं आतां मारलें आहे. तेव्हां त्याच्यावर सर्वस्वीं माझाच हक्क आहे. " असें म्हणून अग्निशिख तें प्रेत मागूं लागला; तरीहि यमशिखानें तें सोडलें नाहीं. तो दांडगाई करतो हें पाहून अग्निशिखानें सम्राट विक्रमादित्याचें स्मरण केलें. त्याच क्षणीं ते तेथें प्रकट झाले. जमिनीवर मनुष्याची आकृति काढून त्यांनीं तीक्ष्ण खड्गाच्या एका प्रहारानें त्या आकृतीचा हात तोडला. त्याबरोबर इकडे यमशिखाचाहि हात तुटून पडला. हें प्रकरण साधेंसुधें नाहीं अशी खात्री पटून यमशिख भीतीनें पळून गेला.

• • •

## मदनमंजरीची कृतज्ञता

इतकें सांगून मदनमंजरी कृतज्ञतेनें पुढें म्हणाली : त्यांच्या उपकाराची फेड कशी करावी याची मला सतत चिंता लागून राहिली होती. पण आज मंत्रसामर्थ्यानें एक महत्त्वाची बातमी मला समजली आहे. सैन्यांतील कांहीं राजांनीं विक्रमशक्तीला ठार मारून

सिंहलेश्वराकडून येणाऱ्या मदनलेखेला पळवून नेण्याचा मोठा कट रचला आहे. आधीं ही बातमी विक्रमशक्तीला जाऊन सांग, म्हणजे तो सावध राहील. मीहि येथें राहूनच त्याला युद्धांत यश मिळेल अशी व्यवस्था करीन. ही महत्त्वाची माहिती देण्यासाठींच मीं आपल्या मायेनें तुम्हांला येथें आणलें आहे. सम्राटांना उचित भेटहि मी लवकरच पाठविणार आहें.

● ● ●

## अद्‌भुत कन्या व सुवर्णमृग यांचा पूर्व इतिहास

मदनमंजरी आम्हांला असें सांगत आहे तोंच प्रथम दिसलेल्या त्या दोन अद्‌भुत कन्या आपल्या त्या सुवर्णमृगासह तेथें आल्या. त्यांच्याबद्दल बरेंच औत्सुक्य असल्यामुळें त्यांची माहिती मी मदनमंजरीला विचारली. तेव्हां ती म्हणाली, “ अनंगदेवा ! यांचा इतिहास मोठा मजेशीर आहे. घंट व विघंट या दोन दानवांना मोहून टाकण्यासाठीं प्रत्यक्ष ब्रह्मदेवानेंच यांना निर्माण केलें. यांना पाहून मोहित झालेल्या राक्षसांनीं एकमेकांत युद्ध केलें व ते नष्ट झाले. नंतर यांना योग्य पति मिळवून देण्यासाठीं ब्रह्मदेवानें यांना कुबेर भाऊजींच्या हातीं सोंपविलें. त्यांनींहि यांना आमच्या हवालीं केलें. सम्राट विक्रमादित्य हेच यांना अनुरूप पति आहेत असें आम्हीं ठरविलें.

“ या सुवर्णमृगाचाहि इतिहास असाच गमतीदार आहे. इन्द्रानें आपल्या लाडक्या मुलाचा हट्ट पुरविण्यासाठीं विश्वकर्म्याकडून एक अद्‌भुत सुवर्णमृग करवून घेतला. पुढें एकदां इन्द्राशीं झालेल्या युद्धांत इन्द्रजितानें इन्द्राचा पराभव केला व इतर वस्तूंबरोबर हा अद्‌भुत मृगहि लंकेला आणला. रामानें रावणाचा वध केल्यानंतर हा मृग कित्येक दिवस बिभीषणाकडेच होता. नंतर बिभीषणानें आम्हांला एकदां भेटीला बोलावून तो आमच्या हवालीं केला. या दोघी या हरणाबरोबर नेहमीं खेळत असतात. आतां या दिव्य कन्यांच्या बरोबर हा सुवर्णमृगहि

सम्राट विक्रमादित्यांनाच द्यायचा असें मीं ठरविलें आहे." हें सर्व सांगत असतां सूर्य अस्ताला गेला. आम्हीं संध्यावंदन वगैरे करून रात्रींचें जेवण उरकलें व त्या दिव्य महालांत झोपीं गेलों. दुसरे दिवशीं सकाळीं जागे होऊन पहातों, तों आपण विक्रमशक्तीच्या शिबिरांत आहोंत असें आम्हांला दिसलें.

मी लगबगीनें जाऊन इतर राजांचा कट सेनापति विक्रमशक्तींच्या कानीं घातला. सिंहलेश्वरांनीं काय संदेश दिला आहे हें सांगण्यापूर्वींच त्या दोन बालिका सुवर्णमृगासह आकाशांतून आमच्या शिबिरांत उतरल्या. त्यांना पाहून इतर सैनिकांत बराच गोंधळ माजला. 'भूत-पिशाच्चांची ही कांहीं तरी अपूर्व माया तर नसेल ना?' अशी शंकाहि अनेकांना आली. पण मी सेनापतींना सर्व गोष्टींची कल्पना दिली. तेव्हां शिबिरांत पुनः शांतता पसरली.

• • •

## कटाचा बीमोड व मदनलेखेचें आगमन

त्या दिव्य कन्या आलेल्या पाहून, सिंहलेश्वरकन्या मदनलेखाच आली असावी, या कल्पनेनें कटांत सामील झालेल्या राजांनीं आपल्या छावणीवर हल्ला चढविला. थोडी फार पूर्वकल्पना असल्यामुळें सर्वजण सावध होते. आपल्या लोकांनीं त्या हल्ल्याला निकरानें तोंड दिलें. त्या दिव्य कन्यांना पोंचविण्यासाठीं आलेल्या यक्षांनींहि शत्रूवर चाल केली व त्या भीषण संग्रामांत अनेकांना कंठस्नान घातलें. शेवटीं आपल्या सैन्याचा विजय झाला. नंतर स्वतः मदनमंजरी आपल्या पतीसह आमच्या शिबिरांत आली व विक्रमशक्तींची गांठ घेऊन त्यांना म्हणाली, "सम्राट विक्रमादित्यांची माझ्या हातून झालेली ही अल्पशी सेवा त्यांच्या चरणीं रुजू करा व या दिव्य कन्यांचा स्वीकार करून आमच्यावरील अनुग्रह कायम ठेवण्याची त्यांना विनंति करा." एवढें बोलून ती पतीसह

अदृश्य झाली. दुसरे दिवशीं सिंहलेश्वराची कन्या मदनरेखा मोठ्या परिवारासह सैन्याच्या शिबिरांत आली. सेनापति विक्रमशक्तींनीं तिचें मोठ्या सन्मानानें स्वागत केलें. ही आनंदाची बातमी आपणास सांगण्या-साठींच त्यांनीं मला पुढें पाठविलें आहे.

• • •

**मदनलेखा व दिव्य कन्या यांच्याशीं विवाह**

अनंगदेवाकडून सर्व हकीगत समजल्यावर विक्रमादित्याला मोठा आनंद झाला. विजयी विक्रमशक्तीला सामोरा जाण्यासाठीं स्वतः विक्रमा-दित्य उज्जयिनीहून निघाला. राजा आपल्याला सामोरा येत आहे याचा विक्रमशक्तीला अभिमान वाटला. दोघांची भेट होतांच सेनापति विक्रम-शक्तीनें सम्राट विक्रमादित्याच्या पायांवर डोकें ठेवलें. विक्रमादित्यानेंहि त्याला उठवून आलिंगन दिलें. त्या दिवशीं वाटेंतच सैन्याचा तळ पडला व मोठा दरबार भरवून, प्रत्येकाच्या योग्यतेप्रमाणें विक्रमादित्यानें प्रत्येकाचा मोठा सन्मान केला. सिंहलेश्वराची कन्या मदनलेखा व मदनमंजरीनें पाठविलेल्या दोन दिव्य कन्या यांचा स्वीकार करून सर्व सैन्यानिशीं तो राजधानीस परतला. नंतर एका शुभ दिवशीं त्यानें त्या तिन्ही कन्यकांशीं विधिपूर्वक विवाह केला. लग्नाच्या वेळीं मदनमंजरीहि आली होती. तिनें राजाला त्या प्रसंगीं दिव्य रत्नांच्या असंख्य राशी भेट म्हणून दिल्या. मदनलेखेचा मोठा भाऊ सिंहवर्मा तिच्याबरोबर आला होता. विवाह-प्रसंगीं त्यानेंहि रत्नांचे सांठे विक्रमादित्याच्या चरणीं अर्पण केले. सम्राट विक्रमादित्य आपल्या नववधूंसह आपला काळ आनंदांत घालवूं लागला.

• • •

**चित्रकारापुढील पेचप्रसंग**

विक्रमादित्याच्या दरबारीं एक कुशल चित्रकार होता. तो दोन दिवसांतून एक पुतळी तयार करून राजाला भेट म्हणून देत असे. राजानें

त्याला त्यासाठीं शंभर गांवें इनाम दिलीं होतीं. एकदां एक मोठा उत्सव चालू होता. त्या वेळीं पुतळी तयार करायला त्याला वेळच मिळाला नाहीं. खरें म्हणजे उत्सवाच्या घाईंत तो तें काम सर्वस्वीं विसरला. दुसऱ्याच दिवशीं राजाकडे जायचें होतें, हें त्याच्या लक्षांत फार उशिरां आलें. अशा स्थितींत काय करावें हा पेंच त्याला पडला. तो विचार करीत बसला असतां एक वाटसरू त्याच्याकडे आला. त्यानें एक मोठी चोपडी त्याच्या हातीं दिला व कांहींतरी निमित्तानें तो तेथून निघून गेला. चित्रकारानें मोठ्या औत्सुक्यानें ती चोपडी उघडून पाहिली, तोंच त्याला एका पानावर एक सुंदर पुतळी काढलेली दिसली. ती त्या चोपडीं-तून काढून घेऊन, राजाला देण्याचें त्यानें ठरविलें.

दुसरे दिवशीं ती सुंदर पुतळी त्यानें राजाला नेऊन दिली. ती अलौकिक पुतळी पाहून राजा मोठ्या आश्चर्यानें म्हणाला, " पुतळीचें हें चित्र कांहीं तुझें नव्हे. कोणाहि मानवी चित्रकाराची ही पुतळी नाहीं. तेव्हां तुला ही कोठें मिळाली सांग बरें. " राजाचा हा प्रश्न ऐकून चित्र-कार गोंधळून गेला. त्यानें सर्व खरी परिस्थिति राजाला सांगितली व त्याची क्षमा मागितली. त्या पुतळींतील राजकन्येनें आपल्या लावण्यानें राजाला वेड लावलें. तो सर्व गोष्टी सोडून रात्रंदिवस त्या काल्पनिक मुलीच्या विचारांत दंग असे.

● ● ●

## एक गोड स्वप्न व भद्रायुधाची युक्ति

एके दिवशीं तो फारच अस्वस्थ झालेला दिसला, तेव्हां भद्रायुध नांवाच्या एका वृद्ध सेवकानें त्याच्या अस्वस्थतेचें कारण विचारलें. तेव्हां तो म्हणाला, " बाबा रे ! पुतळींत पाहिलेली ती मुलगी आज माझ्या स्वप्नांत आली होती. एका लांबच्या द्वीपावर रहाणारी ती एक राजकन्या आहे. मी समुद्र उलंघून त्या द्वीपावरील एका सुंदर नगरींत

गलों. तेथें ती मैत्रिणींच्या घोळक्यांत होती. मला पहातांच 'मारा याला मारा' असें म्हणत त्या माझ्यावर चालून आल्या. जवळच असलेल्या एका तापसीनें मला लपविलें, आणि नंतर मला स्त्रीवेष देऊन राजकन्येच्या हवालीं केलें. राजकन्या मलयावती मला अत्यंत आपुलकीनें वागवूं लागली. तिनें आपलें मन माझ्यापुढें खुलें केलें. मी पुढें कांहीं बोलणार तोंच मला अचानक जाग आली व तें गोड स्वप्न विरून गेलें."

राजाचें तें स्वप्न खरें असावें, अशा कल्पनेनें राजाला आश्वासन देत भद्रायुध म्हणाला, "महाराज! आपण पाहिलेल्या त्या सुंदर नगरीचें हुबेहूब चित्र आपल्याला काढतां आलें तर मलयावतीचा शोध लावण्याचा प्रयत्न मी करतों." त्याच्या आश्वासनानें राजाला बराच धीर आला. त्यानें स्वप्नांतील नगरीचें जसेंच्या तसें चित्र रेखाटून भद्रायुधाला दिलें. भद्रायुधानें तें नवीनच बांधलेल्या एका धर्मशाळेंतील भिंतीवर लावलें. त्या धर्मशाळेंत त्यानें प्रवाश्यांच्या सुखसोयींकडे अधिक लक्ष पुरविलें. प्रत्येक प्रवाश्याला जातांना दोन रेशमी वस्त्रें व सुवर्णदाक्षिणा देण्याचीहि व्यवस्था त्यानें केली. त्यामुळें साहजिकच त्या धर्मशाळेंत दूरदूरच्या प्रदेशांतील प्रवासी येऊं लागले. "राजानें काढलेल्या चित्रांतील नगरी पाहिलेला कोणी प्रवासी आला तर मला कळवा," असें भद्रायुधानें तेथील अधिकाऱ्यांना सांगून ठेवलें.

• • •

## शंबरसिद्धीकडून मलयावतीची माहिती

त्या धर्मशाळेची ख्याति ऐकून शंबरसिद्धि नांवाचा एक प्रवासी तेथें आला. प्रथम त्याचें लक्ष भिंतीवरील चित्राकडे गेलें. तें चित्र पाहून तो आश्चर्यानें म्हणाला, "अहो! ही नगरी पाहिलेला कोणीहि इसम आजपर्यंत मला भेटला नाहीं, मग हिचें चित्र येथें कसें?" त्याचा तो प्रश्न ऐकून धर्मशाळेच्या अधिकाऱ्यांनीं शंबरसिद्धीला भद्रायुधाकडे आणलें.

प्राथमिक चौकशी करून भद्रायुधहि त्याला राजाच्या महालांत घेऊन आला. राजाला वंदन करून ते उभे राहिले, तोंच भद्रायुधानें शंबरसिद्धीची माहिती राजाला सांगितली. तेव्हां राजानें उतावळेपणानें त्याला विचारलें, "खरेंच का तूं तें नगर पाहिलें आहेस ?" तेव्हां शंबरसिद्धि म्हणाला, "महाराज ! समुद्रापलीकडे असलेल्या द्वीपांत मलयपूर नांवाचें हें सुंदर शहर वसलें आहे. मी नुकताच तिकडून आपल्या राजधानीस आलों आहें. तेथें मलयसिंह नांवाचा राजा राज्य करीत असतो. त्याची मुलगी मलयावती पूर्वी पुरुषांचा फारच द्वेष करीत असे. पण स्वप्नांत दिसलेल्या एका सुंदर पुरुषावर तिचें मन जडल्यापासून अलिकडे ती त्याच्या प्राप्ती-साठीं झुरत आहे. 'सहा महिन्यांच्या आंत आपला प्रियकर भेटला नाहीं, तर आपण अग्निप्रवेश करूं' असा निश्चय तिनें बोलून दाखविला आहे. त्या गोष्टीला आतां पांच महिने होऊन गेले."

शंबरसिद्धीनें सांगितलेला हा वृत्तान्त राजाच्या स्वप्नाशीं अत्यंत जुळता असल्यामुळें, तो ऐकून राजाला अत्यानंद झाला. त्यानें शंबर-सिद्धीला खूप मोठें बक्षिस दिलें व मोजकेंच सैन्य बरोबर घेऊन तो मलयपुराकडे जायला निघाला.

मजल दरमजल करीत थोड्याच दिवसांत त्यानें समुद्र गांठला. बरोबर आणलेल्या सैन्याचा तळ तेथेंच ठोकला व अगदीं निवडक मंडळी बरोबर घेऊन तो मलयपुराजवळ आला. नगरांत प्रवेश करण्या-पूर्वींच वेशीवरील एका मंदिराजवळ हजारों नागरिक जमलेले त्याला दिसले. सगळ्यांच्या चेहऱ्यावर दुःखाची छटा पसरलेली होती. जवळ जाऊन त्यानें चौकशी केली, तेव्हां 'प्रियकराची प्राप्ति न झाल्यानें राजकन्या मलयावती अग्निप्रवेश करीत आहे' असें त्याला कळलें. विलंब न लावतां तीरासारखा धांवत जाऊन तो राजकन्येसमोर आला. मलयावतीनें त्याला ओळखलें. त्यालाहि आपल्या प्रियेच्या

भेटीमुळें आनंद झाला. मलयावतीच्या आईवडिलांना आपल्या एकुलत्या एक कन्येचा पुनर्जन्म झाला असें वाटलें. त्यांनीं सम्राट विक्रमादित्याचें स्वागत केलें. मोठ्या गौरवपूर्वक त्याचें आदरातिथ्य करून कांहीं दिवस त्याला आपल्याकडेच ठेवून घेतलें. एका शुभमुहूर्तावर त्यांनीं मलयावतीचा हात त्याच्या हातीं दिला. मलयपुरांतील सर्व नागरिकांनींहि मोठा उत्सव साजरा केला. कांहीं दिवस मलयपुरांत राहून, सम्राट विक्रमादित्य मलयावतीसह उज्जयिनीस परत आला व इतरांबरोबरच तिच्याहि सहवासांत विविध सुखांचा आस्वाद घेत राज्यकारभार पाहूं लागला.

● ● ●

## रानडुकराची शिकार हुकली

एकदां देवसेन नांवाच्या सेवकानें एक मोठा रानडुक्कर सम्राट विक्रमादित्याला दाखविला. त्याची शिकार करण्यासाठीं राजा एका दाट अरण्यांत शिरला. वाटेंत अनेक वाघसिंहांची त्यानें शिकार केली; पण तो काळाकभिन्न रानडुक्कर बराच वेळ त्याला दिसलाच नाहीं. मध्येंच केव्हां तरी तो आपलें तोंड दाखवी व हुलकावणी देऊन अदृश्य होई. सामान्य घोड्यावरून त्याचा पाठलाग करणें अशक्य आहे, हें ओळखून राजानें रत्नाकर नांवाचा आपला विशिष्ट घोडा आणवून घेतला. रत्नाकर हा समुद्रमंथनांतून जन्मलेल्या उच्चैःश्रवाचा मुलगाच होता. वाऱ्यासारख्या वेगवान अशा रत्नाकरावर आरूढ होऊन राजा त्या डुकराचा पाठलाग करूं लागला. शेंकडों योजनें पाठलाग करूनहि शेवटीं तो रानडुक्कर गर्द झाडींत दिसेनासाच झाला. त्यामुळें राजाला अत्यंत वाईट वाटलें. त्यानें सभोंवतीं पाहिलें, तेव्हां एकच एक सेवक — देवसेन त्याच्याबरोबर असल्याचें त्याला दिसून आलें.

● ● ●

## देवसेनाची अद्‌भुत सिद्धि

राजानें त्याला विचारलें, " देवसेना ! शिकारीच्या नादांत आपण किती दूर आलों असूं ? " तेव्हां देवसेन म्हणाला, " महाराज ! आपण बाराशें कोस अंतरावर येऊन पोहोंचलों आहोंत. " त्याचें हें उत्तर ऐकून राजाला आश्चर्याचा धक्काच बसला. त्यानें देवसेनाला पुनः विचारलें, " हें अंतर बाराशें कोस आहे हें तुला नक्की कसें समजलें ? शिवाय तुझ्या-जवळ कोणतेंच वाहन नसतांना माझ्याबरोबर तूं हें अंतर कसें काटलेंस ? " राजाचे हे प्रश्न ऐकून देवसेन म्हणाला, " महाराज, एकदां चंडी नांवाची एक यक्षीण माझ्या निर्भयपणावर प्रसन्न झाली. कोणताहि त्रास न होतां, मला सर्व तीर्थांची यात्रा करतां यावी म्हणून तिनें माझ्या विनंतीला मान देऊन, मला एक दिव्य लेप दिला आहे. त्या लेपाच्या सामर्थ्यावर कोणत्याहि वाहनाशिवाय वायुवेगानें मी पाहिजे तेथें जाऊं शकतों. त्या लेपाच्या दिव्य शक्तीनेंच मी दररोज येथील अमृता-सारखीं गोड फळें खातों व आपल्या सेवेसाठीं उज्जयिनीला येत असतों. आपणाला हवीं असल्यास कांहीं गोड फळें मी आणून देतों. " हें त्याचें म्हणणें ऐकून राजाचें आश्चर्य द्विगुणित झालें व तो देवसेनाला म्हणाला, " मित्रा ! मला कांहीं भूक नाहीं. तूं मात्र फार दमलेला दिसतोस. तेव्हां तूंच कांहीं फळें खा. मग आपण त्या डुकराच्या शोधासाठीं पुनः जाऊं. " राजाची परवानगी मिळतांच देवसेनानें वनांतील एक काकडी खाल्ली. पण तो एकाएकीं अजगर होऊन पडला.

• • •

## देवसेनावर औषधोपचार

त्या निर्जन वनांत आपल्याला सोबत करणारा आपला स्वामिनिष्ठ सेवक अजगर झालेला पाहून राजाला अत्यंत दुःख झालें. विक्रमादित्य

राजानें पूर्वी केवळ एका दृष्टिक्षेपानें भूतकेतु नांवाच्या एका वेताळाला नेत्ररोगांतून मुक्त केलें होतें. त्याचें स्मरण करतांच तो वेताळ राजाजवळ आला व " महाराज ! काय आज्ञा आहे ? " असें विचारूं लागला. तेव्हां राजा विक्रमादित्य त्याला म्हणाला, " मित्रा ! हा माझा सेवक अजगर होऊन पडला आहे, त्याला तूं पूर्वीसारखा कर. " परंतु " आपल्यांत तें सामर्थ्य नाहीं, " असें भूतकेतूनें सांगतांच जवळच्याच भिल्लांच्या वाडींत जाऊन त्याच्यावर कांहीं उपाययोजना होत असली तर पहावी, या विचारानें राजा भूतकेतूबरोबर तिकडे निघाला.

'रत्नजडित सुवर्णालंकार घातलेला एक मनुष्य, एका विचित्र प्राण्याबरोबर आपल्या वाडीकडे येत आहे ' हें पाहून शेंकडों भिल्लांनीं त्याला वेढा दिला व त्याच्यावर बाणांचा जोरदार मारा सुरू केला. पण राजाच्या आज्ञेवरून त्या वेताळानें त्या भिल्लांपैकीं पांचशें जणांना खाऊन टाकलें. तें पाहून इतर भिल्ल घाबरून पळत सुटले व एकाकिकेसरी नांवाच्या आपल्या सेनापतीला त्यांनीं ती गोष्ट सांगितली. प्रथम सेनापति खूपच खवळला; पण आपल्याकडे येणारा माणूस वीर सम्राट विक्रमादित्य आहे हें कळतांच त्यानें राजाचे पाय धरले व त्याच्या येण्याचें कारण सांगतांच, एकाकिकेसरी म्हणाला, " महाराज ! माझ्या मुलाला अनेक औषधि माहीत आहेत. आपला सेवक अजगर होऊन कोठें पडला आहे हें समजलें कीं तो त्या सेवकावर औषधोपचार करील."

राजानें भूतकेतु वेताळाला त्याच्या मुलाबरोबर पाठविलें व एकाकिकेसरीच्या आग्रहावरून तो भिल्लवाडींतील त्याच्या निवासस्थानीं गेला. औषधोपचार झाल्यामुळें पूर्वीप्रमाणें मनुष्य बनलेला देवसेन थोड्याच वेळांत राजाकडे आला. त्याला पाहून राजाला अत्यंत आनंद झाला.

● ● ●

## तरुण मातापित्यांचीं वृद्ध मुलेंबाळें

एकाकिकेसरीचा पाहुणचार घेत असतां राजाला एका गोष्टीचें राहून राहून आश्चर्य वाटत होतें. शेवटीं त्याला गप्प रहावलें नाहीं व त्यानें भिल्लसेनापतीला विचारलें, " मित्रा ! तुझीं इतर मुलेंबाळें पहावींत तर तीं वृद्ध दिसतात व तुम्ही पति-पत्नी मात्र अगदीं तरुण दिसतां हें कसें काय ? " राजाचा हा प्रश्न ऐकून भिल्लांचा नायक त्याला म्हणाला, " महाराज ! माझ्या पुण्याईचें हें फळ आहे. मी मूळचा चंद्रस्वामी नांवाचा ब्राह्मण. वडिलांच्या आज्ञेवरून मी रानांत लांकडें आणण्यासाठीं गेलों असतां, एक वानर माझ्या वाटेवर बसलें होतें. त्याच्यावर कांहींतरी मोठें संकट ओढवलें असावें असें त्याच्या चेहऱ्यावरून मला वाटलें. त्याचा आशय ओळखून मी त्याच्या मागोमाग गेलों. शेवटीं एका जांभळाच्या झाडाजवळ येऊन तें थांबलें व टुणुटुणु उड्या मारीत त्या झाडावर चढलें. मीं वर पाहिलें तों एक वानरी त्या झाडावरील एका वेलीच्या जाळींत अडकून पडलेली मला दिसली. झाडावर चढून हातांतील कुऱ्हाडीनें मीं ती जाळी तोडली व तिला मुक्त केलें. वानरानें कृतज्ञतेनें माझ्याकडे पाहिलें. त्या वानरीलाहि आपल्या सुटकेचा मोठा आनंद वाटला. मी झाडावरून खालीं उतरून आपल्या रस्त्याला लागण्यापूर्वींच त्या वानरानें मला एक दिव्य फळ आणून दिलें. त्या मुक्या प्राण्याच्या कृतज्ञतेचें कौतुक करीत, मीं तें घरीं आणलें आणि मीं व माझी पत्नी, दोघांनीं तें खाल्लें. त्या वेळेपासून आम्हां दोघांना एकहि रोग झाला नाहीं व आमचें म्हातारपणाहि कायमचें नष्ट झालें.

" पुढें आमच्या देशांत दुष्काळ पडला. म्हणून देशान्तर करून मी येथें आलों. त्या वेळीं कांचनदंष्ट्र नांवाचा भिल्लांचा राजा या प्रदेशावर राज्य करीत होता. मी त्याचा सेनापति म्हणून काम करूं लागलों. मी मनोभावें त्याची सेवा केली, म्हणून त्यानें आपलें राज्य मला दिलें.

" माझ्या इतरहि अनेक नायका आहेत. त्यांपैकीं एका क्षत्रिय पत्नीपासून झालेली मदनसुंदरी नांवाची एक मुलगी अत्यंत लावण्यवती आहे. आपण पत्नी म्हणून तिचा स्वीकार कराल तर मला फार आनंद वाटेल. "

● ● ●

## विक्रमादित्याचा भिल्ल राजकन्येशीं विवाह

एकाकिकेसरीची ही विनंति ऐकून राजा कांहींसा गोंधळांत पडला. पण तो भिल्लांचा राजा असला तरी जातीनें ब्राह्मण आहे, ही गोष्ट लक्षांत घेऊन राजानें त्याच्या विनंतीला मान दिला. लवकरच एका शुभ-दिवशीं एकाकिकेसरीनें आपली कन्या राजाला दिली. मोठ्या थाटामाटानें तो विवाह झाला. मोतीं व कस्तुरी लादलेले शंभर उंट एकाकिकेसरीनें राजाला भेट म्हणून दिले. नंतर कांहीं दिवस तेथेंच राहून मदनसुंदरीला घेऊन राजा परत निघाला. त्याच्याबरोबर भिल्लांचें मोठें सैन्य होतेंच. राजाचा सेवक देवसेन व वेताळ भूतकेतु हेहि त्याच्याबरोबरच निघाले.

या अवधींत विक्रमादित्याचा कित्येक दिवस पत्ता नसल्यानें उज्ज-यिनींत एकच गोंधळ माजून राहिला. राजाच्या शोधार्थ सर्व दिशांना दूत रवाना झाले; पण एकालाहि त्याची माहिती मिळूं शकली नाहीं. शेवटीं भद्रायुधानें विक्रमादित्याच्या दिव्य प्रभावाची प्रजेला जाणीव करून दिली व सर्वांचें सांत्वन केलें.

● ● ●

## हुकलेल्या शिकारींतून रहस्याची निर्मिति

मोठ्या लवाजम्यानिशीं मदनसुंदरी मुख्य रस्त्यानें उज्जयिनीकडे जायला निघाली. त्या वेळीं पूर्वीं पाहिलेला डुक्कर कदाचित् पुनः दिसेल या आशेनें राजा विक्रमादित्य, देवसेन व भूतकेतु या दोघांना बरोबर घेऊन, आडवाटेनें अरण्यांतून चालला. योगायोगानें तो रानडुक्कर पुनः त्यांच्या दृष्टीस पडला. ' आतां ही शिकार हातची दवडायची नाहीं '

अशा निश्चयानें विक्रमादित्यानें क्षणाचाहि विलंब न लावतां, एकामागोमाग एक असे पांच बाण त्याला मारले. त्या बाणांनीं घायाळ झालेला तो डुक्कर तेथल्या तेथें मरून पडला.

भूतकेतूनें त्याचें पोट फाडलें; तोंच एक दिव्य पुरुष त्यांतून बाहेर आला. त्याला पाहून सर्वांनाच आश्चर्य वाटलें. राजा त्याची चौकशी करणार, तोंच पर्वतासारखा एक प्रचंड हत्ती त्यांच्यावर चालून आला. विक्रमादित्यानें एका बाणानेंच त्याचें गंडस्थळ फोडलें व त्याला जमिनीवर लोळविलें. भूतकेतु वेताळानें त्या हत्तीचेंहि पोट फाडलें. त्याच क्षणीं एक दिव्य पुरुष त्यांतूनहि बाहेर आला. त्याच्यामागोमाग एक सुंदर स्त्रीहि त्याच हत्तीच्या पोटांतून बाहेर आली. या सर्व अकल्पित घटना पाहून राजाच्या आश्चर्याला सीमाच राहिली नाहीं.

राजा त्यांची चौकशी करण्याच्या विचारांत होता, इतक्यांत डुकराच्या पोटांतून बाहेर आलेला दिव्य पुरुष आपण होऊनच राजाशीं बोलूं लागला. तो म्हणाला, " महाराज ! आम्हांला पाहून आपणास मोठें आश्चर्य वाटलें ना ? आम्ही कोण हें मीच आपणाला सांगतों. हत्तीच्या पोटांतून बाहेर आलेला हा दिव्य पुरुष व मी भाऊ भाऊ आहोंत. याचें नांव शुभ आणि माझें नाव भद्र. आम्ही दोघेहि पूर्वजन्मीं देवांचीं मुलें होतों. आम्ही एकदां असेच भटकत असतां, समाधि लावून बसलेले एक मुनि आमच्या दृष्टीस पडले. त्यांची थोडी चेष्टा करावी या विचारानें माझा भाऊ झाला हत्ती व मी झालों डुक्कर आणि आम्हीं त्या मुनीला त्रास द्यायला सुरुवात केली. तेव्हां समाधिभंग झालेल्या मुनीनें रागावून आम्हांला शाप दिला कीं, " तुम्हीं पशूंचीं हीं रूपें घेऊन निष्कारण माझ्या तपश्चर्येंत विघ्न आणलें, तेव्हां तुम्हांला याच रूपानें वनांत वावरावें लागेल. विक्रमादित्य राजा जेव्हां तुमचा वध करील तेव्हांच तुम्हांला पूर्वदेह प्राप्त होईल ! " तो शाप ऐकून आम्हांला वाईट वाटलें. पण नंतर

त्याचा काय उपयोग ? आम्हांला लागलीच पशूंचा जन्म घ्यावा लागला. पण आज तुमच्या कृपेनें आम्हांला पुनः देवत्व प्राप्त झालें आहे. आपण या मृत डुकराच्या मानेला व गतप्राण हत्तीच्या पाठीला स्पर्श केला तर आपणास एक दिव्य खड्ग व विशाल ढाल मिळेल." असें म्हणून ते देवकुमार अदृश्य झाले. भद्रानें सांगितल्याप्रमाणें राजानें त्या मृत देहांना स्पर्श करतांच त्याच्या हातीं एक दिव्य खड्ग व एक अद्वितीय ढाल शोभूं लागली.

नंतर हत्तीच्या पोटांतून बाहेर पडलेली ती सुंदर स्त्री राजाला आपली हकीगत सांगूं लागली. ती म्हणाली, " महाराज ! आपल्या राजधानींत धनदत्त नांवाचे एक व्यापारी आहेत, त्यांची मी पत्नी. मी एकदां आमच्या घरीं माडीवर झोंपलें होतें. त्या वेळीं या हत्तीनें तेथें येऊन मला गिळून टाकलें. तेव्हांपासून मी त्याच्याच पोटांत होतें. आपण माझी मुक्तता केलीत. पण या अरण्यांत मी आतां काय करूं ? " असें म्हणून ती शोक करूं लागली. तेव्हां राजानें तिला तिच्या पतीकडे सुखरूप पोहोंचविण्याचें आश्वासन दिलें व भूतकेतूकडून तिला मदनसुंदरीकडे पोहोंचविलें. भूतकेतु परत आल्यावर ते पुनः आडमार्गानें अरण्यांतून जाऊं लागले.

• • •

### गुणवतीवर ओढवलेला प्रसंग

दाट वनराईतून ते निघाले, त्या वेळीं त्या अरण्यांतून कांहीं सैनिक व इतर परिवार कोठें तरी चाललेला होता. तो पाहून राजाला मोठें आश्चर्य वाटलें. ते लोक कोण आहेत हें जाणून घेण्यासाठीं त्यानें देवसेनाला तिकडे पाठविलें. देवसेनानें त्यांच्या एका कंचुकीलाच राजाकडे आणलें. राजानें कंचुकीला प्रश्न केला. तो आपली हकीगत सांगूं लागला :

महाराज ! समुद्रामध्यें कटाह नांवाचें एक छोटेंसें पण सुंदर द्वीप आहे. तेथें गुणसागर नांवाचा राजा राज्य करीत असतो. त्याची गुणवती

नांवाची एक सुस्वरूप व सद्गुणी मुलगी आहे. ती सात द्वीपांवर साम्राज्य गाजविणाऱ्या सम्राटाची राणी होणार, असें भविष्य ज्योतिष्यांनीं वर्तविलें. त्या भविष्याप्रमाणें, सम्राट विक्रमादित्याशिवाय दुसरा कोणीहि पति तिला योग्य नाहीं, असें ठरवून गुणसागरानें तिला मोठ्या परिवारासह उज्जयिनीस पाठविलें. आम्ही नौकेंतून प्रवास करीत होतों. आमची नाव सुवर्णद्वीपाजवळ येतांच एका प्रचंड माशानें सर्वांसह ती नावच गिळून टाकली. त्यामुळें स्वतःच्या शरिराचा बोजा न सांवरूं शकणारा तो मासा लाटांवरच तरंगूं लागला व शेवटीं किनाऱ्यावर येऊन मरून पडला.

माशाचें तें धूड पडलेलें पाहून अनेक कोळी तेथें आले. त्यानीं आपल्या तीक्ष्ण आयुधांनीं त्या माशाचें पोट फाडलें. तेव्हां ती नाव जशीच्या तशी बाहेर आली. नावेंतील प्रवासी मात्र अगदीं गुदमरून गेले होते. माशाच्या पोटांतून आंत प्रवासी असलेली नाव बाहेर पडलेली पाहून सर्वच लोकांना आश्चर्य वाटलें. ती अद्भुत घटना सुवर्णद्वीपावरील चंद्रशेखर राजाच्याहि कानांवर गेली. तो स्वतः ती नाव पहाण्यासाठीं आला. आपलीच भाची गुणवती त्या नावेंतून प्रवास करीत होती तें पाहून तर तो आश्चर्यानें थक्कच झाला. त्यानें सर्व प्रवाश्यांना आपल्या वाड्यांत आणलें. सर्वांना जरुरीप्रमाणें औषधोपचार केले व आपली भाची प्राणसंकटांतून वांचल्याबद्दल त्यानें आपल्या राजधानींत मोठा उत्सव केला.

• • •

## विक्रमादित्याच्या नामाच्या उच्चाराचें महत्त्व

आपली कन्या चंद्रवती विक्रमादित्यालाच द्यायची, असें चंद्रशेखरानें पूर्वीपासूनच मनाशीं ठरविलें होतें. त्यानें गुणवतीबरोबरच चंद्रवतीलाहि उज्जयिनीस पाठविलें. दोन्ही राजकन्या जलमार्गानें सुखरूप येथें येऊन पोहोंचल्या. पण या अरण्यांत भलतेंच एक संकट ओढवलें. आम्ही परिवारासह या अरण्यांतून चाललों असतां एक रानडुक्कर व एक रानटी

हत्ती यांनीं आमच्यावर हल्ला केला. आतां कांहीं आपली धडगत नाहीं, अशी आमची खात्री झाल्यावर आम्हीं देवतांचा धांवा सुरू केला, " हे लोकपालांनो ! विक्रमादित्याला वरण्यासाठीं निघालेल्या या राजकन्यांना हे रानटी पशु मारून टाकीत आहेत. तेव्हां आतां तुम्हीच यांचें रक्षण करा." आमचा हा धांवा ऐकून ते पशूच मनुष्यवाणीनें म्हणाले, " त्या पुण्यश्लोक राजाच्या नामोच्चारानेंच तुमचें संकट दूर झालें आहे. आज या वनांतच त्या राजाचें दर्शन तुम्हांला घडेल." असें म्हणून ते आल्या वाटेनें निघून गेले व आम्हीहि आतां उज्जयिनीच्या मार्गाला लागलों आहोंत.

कंचुकीनें ती सर्व माहिती सांगितली असतां, देवसेनानें ' हेच ते विक्रमादित्य महाराज ' असें म्हणून विक्रमादित्याची माहिती करून दिली. नंतर कंचुकीनें राजाला वंदन केलें आणि आपल्याबरोबर आणलेल्या दोन्ही राजकन्यांचा स्वीकार करण्याची त्याला विनंति केली. राजानें ती विनंति आनंदानें मान्य केली. नंतर ' याहि दोघी मदनसुंदरीबरोबरच उज्जयिनीस येऊं द्यात ' असें म्हणून त्यांना त्यांच्या परिवारासह राणीकडे पोहोंचविण्याची कामगिरी राजानें भूतकेतु वेताळास सांगितली. तोहि राजाच्या आज्ञेप्रमाणें सर्वांना मदनसुंदरीकडे पोहोंचवून पुनः राजाकडे आला.

● ● ●

## शिवमंदिरांतील अद्भुत दृश्य

पुनः ते तिघे आडवाटेनें प्रवास करूं लागले. सूर्य अस्ताला चालला होता. इतक्यांत जवळूनच मृदंगाचा मंजुळ आवाज त्यांच्या कानीं आला. " इतक्या निबिड अरण्यांत मृदंगाचा मंजुळ आवाज कोठून येतो ? " असें राजानें विचारलें असतां, भूतकेतु म्हणाला, " महाराज, विश्वकर्म्यानें या अरण्यांत एक अद्भुत व सुंदर शिवमंदिर बांधलें आहे. तेथें सूर्योदय व सूर्यास्त या दोन्ही प्रसंगीं दिव्य स्त्रीपुरुष नृत्यगीतांनीं शंकराची आराधना

करीत असतात. त्यांच्या मृदंगाचा हा आवाज असावा." त्याचे हे शब्द ऐकून तें देवालय पहाण्याची आपली इच्छा राजानें प्रकट केली. तेव्हां भूतकेतु, राजा व देवसेन यांना बरोबर घेऊन देवळांत आला. तेथील दृश्य कांहीं अपूर्वच होतें. मंदिराच्या गाभाऱ्यांत रत्नमय शिवलिंग तेजानें तळपत होतें. नुकतीच पूजा झाली असून देवापुढें मोठीं नीरांजनें तेवत होतीं. हे तिघे मंदिरांत आले, त्या वेळीं दिव्य स्त्रियांनीं आपलें नृत्य थांबविलें व प्रत्येक स्त्रीनें देवालयांतील एका खांबावरील बाहुलींत प्रवेश केला. देवदर्शन घेऊन नृत्य करणाऱ्या दिव्य पुरुषांनीं मंदिरांतील दुसऱ्या एका खांबावरील पुरुषाकार मूर्तींत प्रवेश केला व ते सर्वच दिसेनासे झाले. राजाला आज आश्चर्यामागून आश्चर्यें पहायला मिळत होतीं.

● ● ●

## मूर्तीच्या सौंदर्यानें राजा अस्वस्थ

चित्रकला व शिल्पकला यांची आवड असलेला राजा त्या खांबावरील मूर्ति निरखून पाहूं लागला. त्या वेळीं एका मूर्तीनें त्याचें लक्ष वेधून घेतलें. टक लावून तो त्या मूर्तीकडे पहात होता. 'असलें सौंदर्य असलेली मूर्तिमंत स्त्री आपणास मिळाली नाहीं तर आपलें आयुष्य व्यर्थ' असा विचार मनांत येऊन तो बराच अस्वस्थ झाला. तें जाणून भूतकेतु म्हणाला, "महाराज ! कलिंग देशाची राजकन्या कलिंगसेना ही आपल्या सौंदर्यानें रतीलाहि लाजवील अशी आहे. तिच्यासारखी सुंदर मूर्ति खोदण्याच्या ईर्षेनें एका कारागिरानें ही मूर्ति बनविली आहे. उज्जयिनीस गेल्यानंतर कलिंगसेनेसाठीं मागणी घातली तर कलिंगसेन आपली मुलगी आनंदानें आपल्याला अर्पण करील. जर त्यानें आपली मागणी झिडकारली, तर आपण आपल्या पराक्रमानें तिला हरण करूं शकाल." वेताळाचें हें म्हणणें राजाला पटलें. ती रात्र त्यांनीं त्या मंदिरांत घालविली व दुसरे दिवशीं सकाळीं ते तिघे पुढच्या प्रवासास निघाले.

● ● ●

### उज्जयिनींतील व्यापाऱ्याची भेट

ते अरण्यांतून मार्ग काढीत चालले असतां, एका अशोक वृक्षा-खालीं दोन सुसंस्कृत तरुण त्यांना दिसले. सम्राट विक्रमादित्याला पहा-तांच ते दोघेहि उठून उभे राहिले व "महाराजांचा जयजयकार असो" असें म्हणत त्यांनीं राजाला वंदन केलें. आपणाला ओळखणारे हे कोण, हें जाणण्याची राजाला इच्छा झाली. त्यानें "तुम्ही कोण व या निबिड अरण्यांतून तुम्ही कां प्रवास करीत आहां?" असा प्रश्न त्यांना केला. तेव्हां त्यांच्यापैकीं एक म्हणाला, "महाराज! मी आपल्याच राजधानीं-तील एक व्यापारी आहें. माझें नांव धनरत्न. एके दिवशीं माडीवर झोंप-लेली माझी पत्नी एकाएकीं अदृश्य झाली. तिचा शोध करण्यासाठीं मी माझ्या या मित्रासह बाहेर पडलों. कित्येक दिवस शोध करूनहि तिचा पत्ता लागला नाहीं. तिला कुणीं पळविलें असलें तरी तिचें चारित्र्य अजूनहि शुद्ध आहे. कारण 'माझें आचरण शुद्ध असेल, तर ही माळ कधींहि सुकणार नाहीं,' असें म्हणून तिनें दिलेली माळ अजूनहि टवटवीत आहे. अशा समाधानांत आम्ही या अरण्यांतून भट-कत असतां एक रानटी हत्ती आम्हांला दिसला. त्यानें माझ्यादेखत तिला तोंडांतून बाहेर काढलें व माझ्या दृष्टीला ती पडते न पडते, तोंच तिला पुनः गिळूनहि टाकलें. तो अद्‌भुत प्रकार पाहून आम्ही त्या हत्ती-च्या पाळतीवर राहिलों. पण एकदां तो जो अदृश्य झाला, तो पुनः आम्हांला दिसलाच नाहीं."

धनरत्नाची ही हकीगत ऐकून विक्रमादित्यानें त्याला धीर दिला. पत्नीच्या मुक्ततेची आनंददायक माहिती सांगून, राजानें त्याची व त्याच्या पत्नीची भेट घडवून दिली. तेव्हां पतिपत्नींनीं राजाचे शतशः आभार मानले व त्याच्या संमतीनें तीं आपल्या घरीं गेलीं.

नंतर गुणवती, चंद्रवती आणि मदनसुंदरी यांच्यासह लवकरच तोहि उज्जयिनीस जाऊन पोहोंचला. तेथें एका शुभमुहूर्तावर त्यानें गुणवती व चंद्रवती यांच्याशीं विवाह केला व तो सुखानें राहूं लागला.

● ● ●

## कलिंगसेनेची प्राप्ति

पण तो एकटाच असला म्हणजे विश्वकर्म्यानें रचलेल्या त्या देवळांतील खांबावरची मूर्ति त्याच्या दृष्टीसमोर तरळूं लागे, व 'कलिंगसेना आपणास कशी मिळेल' याचा तो सारखा विचार करी. त्यानें अप्रत्यक्षपणें कलिंगसेनाला तसें सुचवूनहि पाहिलें, पण त्याचा उपयोग झाला नाहीं. तेव्हां प्रतिहारीला पाठवून विक्रमादित्यानें कलिंगसेनाला कळविलें, "तुम्ही आपली कन्या कलिंगसेना ही महाराज विक्रमादित्याला देऊन त्यांच्याशीं सोयरिक जोडा व सुखानें राज्यकारभार पहात रहा." विक्रमादित्याचा तो संदेश ऐकून कलिंगसेनाचा अभिमान दुखावला गेला. त्यानें रागानें प्रतिहारीबरोबर उलट निरोप दिला, "सुखानें राज्यकारभार कसा पहायचा तें आमचें आम्हांला चांगलें कळतें ! तुम्हांला मात्र कलिंगसेनेचें नखहि पहायला मिळणार नाहीं, याची खात्री बाळगा." कलिंगसेनाकडून आलेला निरोप ऐकून विक्रमादित्य खूपच खवळला.

रागाच्या भरांत त्यानें प्रचंड सैन्य बरोबर घेतलें व कलिंग देशावर स्वारी केली. शेवटीं राजधानीला तो वेढा देऊन बसला. त्याच्या सैन्यांत चतुरंग दल होतेंच; पण त्याचबरोबर भुतें, पिशाच्चें, वेताळ यांच्यासारखे भयंकर प्राणीहि त्याच्या सेवेस हजर होते. समोरासमोर लढण्याचा प्रसंग आलाच, तर आपल्या भावी सासऱ्यावरच हात उगारावा लागेल व कलिंगसेनेवर त्याचा विपरीत परिणाम होईल, या विचारानें तो बराच अस्वस्थ झाला. शेवटीं वेगळ्याच मार्गानें कलिंगसेनाला आपला प्रभाव दाखवायचा, असें त्यानें ठरविलें.

वेताळाच्या सिद्धीनें तो रात्रीं अनेक पहाऱ्यांतून कोणालाहि न दिसतां कलिंगसेनाच्या महालांत आला. वेताळानें गाढ झोंपलेल्या कलिंगसेनाला जागें केलें व त्याला म्हटलें, " अरे खुळ्या ! अनेक सिद्धि प्राप्त झालेल्या विक्रमादित्याशीं वैर करून तुला झोंप तरी कशी लागते ? " कलिंगसेन खडबडून जागा झाला. कडेकोट पहारा असतांना विक्रमादित्य आपल्या महालांत कसा आला, याचेंच त्याला आश्चर्य वाटलें. वेताळानेंहि कलिंगसेनाला आपल्या अद्भुत सामर्थ्याची चुणूक दाखविली. तेव्हां निष्कारण अभिमानाला बळी पडून आत्मघात करून घेण्यांत कांहीं अर्थ नाहीं, ही गोष्ट त्याला पटली. त्यानें विक्रमादित्याशीं सामोपचाराचीं बोलणीं सुरू केलीं व आपली कन्या कलिंगसेना त्याला देण्याचें वचन दिलें. तेव्हां विक्रमादित्य त्या वेताळासह एकाएकीं अदृश्य झाला व आपल्या शिबिरांत येऊन सुखानें झोंपी गेला.

दुसरे दिवशीं युद्धाच्या छावणीचें स्वरूप सर्वस्वीं पालटून गेलें. सगळीकडे मंगलविवाहाची एकच धामधूम सुरू झाली. दोन्ही पक्षांत आनंदीआनंद झाला. दुसरे दिवशीं शुभमुहूर्तावर कलिंगसेनानें आपली मुलगी विक्रमादित्याला दिली. विवाहाचा समारंभ मोठ्या थाटानें पार पडला. विक्रमादित्यानें कलिंगसेनेवरील गाढ प्रेमामुळेंच युक्तीचा अवलंब करून तिच्याशीं विवाह केला होता. या गोष्टीमुळें कलिंगसेनेलाहि त्याच्याबद्दल धन्यता वाटत होती. विवाहानंतर कलिंगसेनेला घेऊन विक्रमादित्य उज्जयिनीस परत आला व सुखानें राज्य करीत राहिला.

• • •

**शंकराच्या पायाशीं परत**

अशा तऱ्हेनें विक्रमादित्य मोठ्या वैभवानें राज्य करीत होता. त्यानें म्लेच्छांचा संपूर्ण उच्छेद करून वैदिक धर्माचें रक्षण केलें. आपल्या प्रजाजनांच्या ~~सुखदुःखाकडे जातीनें लक्ष देऊन त्यांच्यावरील संकटांचें~~

IRBK-0106258
IRBK-0106258

निवारण केलें. आणि अखेर आपलें अवतारकार्य पूर्ण झालें आहे. हें पाहून विक्रमादित्य तपश्चर्येसाठीं वनांत निघून गेला. तेथें खडतर तपांनीं जर्जर झालेलें आपलें कृश शरीर टाकून, तो माल्यवान् नांवाचा दिव्य विद्याधर बनला व पूर्वीप्रमाणें शंकराच्या उपासनेंत गढून गेला.


**महाकवि गुणाढ्याच्या कथासरित्सागरांतील**
**निवडक दहा कथांचीं दहा मराठी पुस्तकें**

अनुवादक :
प्र. शं. जोशी, एम. ए., बी. टी., काव्यतीर्थ, व्याकरणविशारद

१. महामति वररुचि
२. महाकवि गुणाढ्य
३. साहसी श्रीदत्त
४. पराक्रमी विदूषक
५. वत्सराज उदयन
६. स्वाभिमानी गुणशर्मा
७. यक्षराज शक्तिदेव
८. शापभ्रष्ट श्रीदर्शन
९. बाहुशाली भीमभट
१०. सम्राट विक्रमादित्य

**प्रत्येक पुस्तक ४० नये पैसे; पेटींतील संच ४ रुपये**

* * * * * * * * * * * * * * * * * * * *

वोरा अॅण्ड कंपनी पब्लिशर्स प्रायव्हेट लिमिटेड,
३, राउंड बिल्डिंग, काळबादेवी रस्ता, मुंबई २